
स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद – कर्मवीर



रयत शिक्षण संस्थेचे,

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली) ता. पलूस, जि. सांगली



## अर्थशास्त्र विभाग, वाणिज्य विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC)

## एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा

# "भारतातील शेतमाल विपणनाची सद्यस्थिती"

### अहवाल

**दि. 8 एप्रिल, 2022.**

रयत शिक्षण संस्थेचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर (बुर्ली), अर्थशास्त्र विभाग, वाणिज्य विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांना पीक उत्पादन आणि उत्पादित शेतमालास योग्य बाजारपेठ व योग्य बाजारभाव कसा मिळेल याचे मार्गदर्शन करण्याच्या उदात्त हेतूने शुक्रवार दि. 08/04/2022 रोजी सकाळी ठीक 10.00 वाजता **"भारतातील शेतमाल विपणनाची सद्यस्थिती"** या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेसाठी साधन व्यक्ती म्हणून अर्थमंत्रालय, थायलंड सरकारचे वाणिज्य सल्लागार, मा. श्री. चेतन अरूण नरकेसो यांनी मार्गदर्शन केले. तसेच कार्यशाळेचे अध्यक्षस्थान महाविद्यालय विकास समिती सदस्य मा. श्री. जे. के. (बापू) जाधवसो यांनी भूषविले.

अर्थमंत्रालय, थायलंड सरकारचे वाणिज्य सल्लागार, मा. श्री. चेतन अरूण नरकेसो यांनी कार्यशाळेसाठी उपस्थित शेतकरी, शेतमाल उद्योजक, शिक्षक, शिक्षकेत्तर स्टाफ आणि विद्यार्थ्यांना केलेल्या मार्गदर्शनामध्ये कोरोना कालावधीत भारतीय अर्थव्यवस्थेस शेती आणि शेतकऱ्यांनी तारले आहे, तसेच भारतीय कृषीविषयक धोरणे ही शेतीपूरक असली तरी बहुतेक शेतकरी या धोरणापासून अनभिज्ञ आहेत असे प्रतिपादन केले. शेतकऱ्यांनी शेती कसत असताना भारतीय कृषीविषयक धोरणांचा अभ्यास करावा, हवामानाचा अंदाज घेवून पिकांचे व्यवस्थापन करावे तरच शेतकऱ्यांना शेतीमधून चांगल्या दर्जाचे उत्पन्न मिळू शकेल. योग्य नियोजन करूण शेतीमध्ये चांगले पिक पिकविणे हे यशस्वी शेतीचे प्रतिक राहीले नसून शेतीमध्ये उत्पादित मालास योग्य बाजारभाव कसा मिळेल याचे ज्ञान शेतकऱ्यांना असायला हवे आणि ही काळाची गरज बनली आहे असेही प्रतिपादन मा. श्री. चेतन अरूण नरकेसो यांनी केले. भारतीय बाजारपेठेत कोणत्या वस्तूंची मागणी आहे याचा अंदाज घेवून शेतकऱ्यांनी शेती कसावी. शेतकऱ्यांनी बाजापपेठ आणि शेतमाल विपणन व्यवस्था समजावून घेवून शेती उत्पादन घेतले तरच शेतकरी भारतीय अर्थव्यवस्थेत टिकू शकेल असे मत

नरके साहेबांनी नोंदविले. याचबरोबर कार्यशाळेच्या शेवटच्या सत्रामध्ये नरके साहेबांनी उपस्थित शेतकरी, शेतमाल उद्योजक व विद्यार्थ्यांकडुन उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली.

महाविद्यालय विकास समिती सदस्य मा. श्री. जे. के. (बापू) जाधवसो यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये आपला शेतकरी अलिकडच्या काळात आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करूण शेती कसत आहे पण वातावरण आणि निसर्गात होणाऱ्या बदलामुळे त्याला मोठ्या नुकसानाला सामोरे जावे लागत आहे. यामुळे शेतकऱ्यांनी हवामानाबद्दल साक्षर होणे गरजेचे आहे यासारख्या मुद्द्यांवर प्रकाश टाकला.

सदरची कार्यशाळा यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी ज्यांनी आम्हाला मार्गदर्शन केले ते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी आपले मनोगत व्यक्त करताना भारतीय शेतकरी हा कशा प्रकारे दारिद्र्यात आपले जीवन जगत आहे याचे विश्लेषण केले. शेतकऱ्यांकडे पिकावू शेतजमिन मोठ्या प्रमाणत उपलब्ध आहे पण पुरेशा ज्ञानाअभावी त्यांना या जमिनीतून योग्य उत्पन्न मिळत नाही असे मत व्यक्त केले.

या कार्यशाळेसाठी श्री. क्रांतीकुमार जाधव, कृषी उद्योजक श्री. राजाराम गाडे, कृषी उद्योजक श्री. सागर लुपणे, कृषीभूषण सुरेश चव्हाण, श्री. संपत पाटील, श्री. प्रमोद जाधव, श्री. संजय जाधव, श्री. दिनकर आरबुने यासारखी प्रगतशील शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व स्वागत श्रीमती प्रतिभा पुदाले, आभारप्रदर्शन प्रा. सागर कुंडले आणि सूत्रसंचालन डॉ. श्रीमती अश्विनी तातुगडे यांनी केले.

फलनिष्पत्ती :

1. सहभागी शेतकरी, शेतमाल उद्योजक, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना भारतीय कृषीविषयक धोरणामधील तरतुदी समजल्या.
2. सहभागी शेतकरी, शेतमाल उद्योजक, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना शेतमाल विक्रीसाठी बाजारपेठ कशी शोधावी याचे ज्ञान प्राप्त झाले.
3. सहभागी शेतकरी, शेतमाल उद्योजक, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना शेती कसताना हवामानास किती महत्व द्यावे हे लक्षात आले.
4. सहभागी शेतकरी, शेतमाल उद्योजक, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना शेतमाल परदेशी निर्यात करण्याची प्रक्रिया समजली.

**शेतकरी : 27** **शेतमाल उद्योजक : 08**

**विद्यार्थी : 89** **शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी : 29**

**एकूण लाभार्थी : 153**

For Head,
Department of Economics
Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya,
Ramanandnagar (Burli)

Head,
Department of Commerce
Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya,
Ramanandnagar (Burli)

प्राचार्य,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.



मा. श्री. चेतन अरूण नरकेसाो मार्गदर्शन करताना



मा. श्री. जे. के. (बापू) जाधवसाो मार्गदर्शन करताना



प्राचार्य डॉ. एल. डी. कदम साहेब मार्गदर्शन करताना



पाहुण्यांची विद्यार्थ्यांशी हितगूज





कार्यशाळेस उपस्थित शेतकरी, शेतमाल उद्योजक, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी

for **Head,**
**Department of Economics**
**Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya.**
**Ramanandnagar (Burli)**

**Head,**
**Department of Commerce**
**Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya,**
Ramanandnagar (Burli)

**प्राचार्य,**
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.